॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १३ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्र, हिंदी व मराठी विभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी, मुंबई आणि राष्ट्रीय उर्दू भाषा विकास परिषद, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ व २४ डिसेंबर २०२६ रोजी 'गझल-गीत कौशल्य विकास' या विषयावर दोन दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्रात गझल, गीत व कवितेच्या माध्यमातून होणारा कौशल्य विकास, साहित्याचे मानवी जीवनातील महत्त्व आदी विषयांवर तज्ज्ञ अभ्यासक व संसाधन व्यक्ती संवाद साधणार आहेत. यासोबतच मराठी, हिंदी व उर्दू गझलकारांच्या सहभागातून मुशायऱ्याचेही आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रात मराठी, हिंदी, शिक्षणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र व सामाजिक शास्त्रातील अभ्यासक आणि संशोधकांना संशोधनपत्र सादर करण्याची संधी आहे. इच्छुकांनी नोंदणी लिंक (https://shorturl.at/h1Sem) द्वारे नावनोंदणी करून संशोधनपत्र सादर करावे, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. १३ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) पथकाच्या वतीने 'स्वच्छ भारत, हरित भारत' या संकल्पनेवर आधारित पोस्टर निर्मिती व परिसर स्वच्छता जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात २९ एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश स्वच्छता, वैयक्तिक आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे हा होता. पोस्टर निर्मितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वच्छ परिसराचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

कॅडेट्सनी स्वच्छ भारत अभियान, पर्यावरण संरक्षण, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, कचरापेटीचा योग्य वापर आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट यांसारख्या विषयांवर रंगीत व संदेशपूर्ण पोस्टर्स तयार केली. प्रत्येक कॅडेटने आपल्या पोस्टरमागील संकल्पना आणि संदेश उपस्थितांसमोर मांडला. दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या सवयींमधून स्वच्छता राखता येते, हा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांच्या नेतृत्वात एन सी सी चे प्रा. रोहन कोष्टी, एनसीसीच्या प्रशिक्षिका कु. सृष्टी पांड्या यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**